# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२-२९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ५१-२२** **दिनांक १४/०२/२०२२**

## "घरफोडी करणाऱ्या आरोपीतास अटक करून मुद्देमाल हस्तगत करण्यात पेल्हार पोलीस ठाणेच्या, गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश"

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि.०२/०१/२०२१ रोजी पहाटे ०२.०० वाजता ते ०४.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी श्री.मोईद अहमद खान, वय-३४ वर्षे, रा. पेल्हार रोड, नालासोपारा फाटा, नालासोपारा(पु.), ता.वसई, जि.पालघर येथील यांचे राहते घरात कोणीतरी अज्ञात चोरटयाने दरवाजावाटे घरात प्रवेश करुन, घरातील बॅगमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व दोन मोबाईल असा मुद्देमाल चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांवर पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ०४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-३८० प्रमाणे दि.०२/०१/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन, घटना ठिकाणचे व आजु-बाजुचे सी.सी.टी.व्ही. फुटेजचे परिक्षण केले असता, सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये गुन्हा घडल्याचे दरम्यान दोन अनोळखी इसम हातात लोखंडी रॉड घेवुन जात असल्याचे दिसुन आल्याने, नमुद आरोपीतांचा शोध घेतला असता, यातील आरोपीत नामे. सुरज सरोज, वय-२१ वर्षे, रा.नालासोपारा(पु.), ता.वसई, जि.पालघर, हा मिळुन आल्याने, त्यास दि.०८/०२/२०२२ रोजी नमुद गुन्हयात अटक केली आहे. नमुद आरोपीत याचेकडून गुन्हयातील चोरीस गेलेले **६०.७५ ग्रॅम** वजनाचे **व १,९५,०००/- रुपये** किंमतीचे सोन्याचे दागिने असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री.प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री.महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, पोना/तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---------oooo----------